<u>नियमित फौजदारी खटला क्र.१६३/२०२५</u>

<u>निशाणी क्र.१३</u>

## दोषारोप

मी, डी.एम.हिंग्लजकर, न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, अकोले, तुम्हावर दोषारोप ठेवत आहे की,

**अमोल एकनाथ शिंदे,**
वय वर्ष– ३७, व्यवसाय – शेती,
रा.चास, ता.अकोले, जि.अहमदनगर.

**खालीलप्रमाणेः–**

**१.** दिनांक ०२.१०.२०२५ रोजी रात्री ०९.३० वाजताचे सुमारास मौजे कळमजाई माता मंदिर, चास, ता.अकोले, जि.अहमदनगर येथे तुम्ही फिर्यादी लहानु ब्रम्हाजी ढोकरे यांना काठी की, ज्याने मृत्यू होण्याचा संभव आहे, अशा हत्याराने व हाताने मारहाण करून त्यांचे किरकोळ दुखापतीस कारणीभूत झालात, आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१) अन्वये गुन्हा केल्याचे तोहमत आहे व हा गुन्हा या न्यायालयाचे अधिकार क्षेत्रातील आहे.

**२.** वर नमूद दिनांकास, वेळी व ठिकाणी तुम्ही फिर्यादी यांना काठीने व हाताने मारहाण केली व त्यांचे किरकोळ दुखापतीस कारणीभूत झालात, आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११५(२) अन्वये गुन्हा केल्याचे तोहमत आहे व हा गुन्हा या न्यायालयाचे अधिकार क्षेत्रातील आहे.

**३.** वर नमूद दिनांकास, वेळी व ठिकाणी तुम्ही फिर्यादी यांना शिवीगाळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली व त्यांना फौजदारी पात्र धाकदपटशा केली, आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३५१(२)(३) अन्वये गुन्हा

केल्याचे तोहमत आहे व हा गुन्हा या न्यायालयाचे अधिकार क्षेत्रातील आहे

आणि यावरुन मी तुम्हाला सुचना करतो की, तुमची माझेसमोर या दोषारोपांची चौकशी होणार आहे.

–

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR Date: 2026.03.10 17:34:50 +0530

**दिनांक : ०९.०३.२०२६** **(डी.एम.हिंग्लजकर)**
**ठिकाण : अकोले** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले.**

टिपण :– हा दोषारोप आरोपीला वाचून व समजावून सांगितला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR Date: 2026.03.10 17:34:56 +0530

**दिनांक : ०९.०३.२०२६** **(डी.एम.हिंग्लजकर)**
**ठिकाण : अकोले** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले.**